मा.सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर शासनामार्फत करावयाच्या कार्यवाहीसाठी शिफारस करण्याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या करंदीकर समितीची रचना, कार्ये व मानधन निश्चितीबाबत......

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक:जहिया-२०१७/प्र.क्र.१६/२०१७/का-७**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक: ०२ डिसेंबर, २०१७**

**संदर्भ :** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक जहिया-२०१७/प्र.क्र.१६/२०१७/का-७, दिनांक-२९ सप्टेंबर, २०१७.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक जहिया-२०१७/प्र.क्र.१६/२०१७/का-७, दिनांक-०३ नोव्हेंबर, २०१७.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त संदर्भाधीन-१ येथील शासन निर्णयान्वये जनहित याचिका क्रमांक १५३/२०१२ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा.न्यायमूर्ती, श्री.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली गठित चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाची छाननी करुन शासनामार्फत करावयाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्याकरिता श्री.पी.डी.करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठित करण्यात आलेली आहे.

२. वरील संदर्भाधीन-२ येथील शासन निर्णयान्वये सदर समितीचे अध्यक्ष यांना सहाय्य करण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती प्रशासकीय कारणास्तव या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत असून श्रीमती एन के.राऊत, अधिव्याख्याता, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१७१२०२१२१७२२५६२४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Yogesh A Sawant

Digitally signed by Yogesh A Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cefaf50ac0e3c1b6570c758525237ee6d89f57ad6f8775d3c4a59d92d913372, cn=Yogesh A Sawant
Date: 2017.12.02 12:21:28 +05'30'

**(योगेश अ.सावंत)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१.मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा, यांचे खाजगी सचिव

५. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद, यांचे खाजगी सचिव
६.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७.प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८.सचिव, मख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
९.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
१०.सचिव, संसदिय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१२.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१३. श्री.पी.डी.करंदीकर, भा.प्र.से.(सेवानिवृत्त),जी-१५, अथश्री कॉम्प्लेक्स, मगरपट्टा, मुंढवा रोड, हडपसर, पुणे-४११ ०३६
१४. श्रीमती सानिका देशपांडे, उप संचालक (वित्त व लेखा सेवा), नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक,पुणे
१५.श्रीमती एन के.राऊत, अधिव्याख्याता, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१६.निवड नस्ती (का-७)